**मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., प्लॉट नं. जी-७, जी-७ भाग, जी-८, जी-९, जी-१०/१, जी-१०/२, जी-११, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना, ता.जि. जालना येथे प्रस्तावीत केलेल्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि पर्यावरण मंजूरीकरीता (रोलिंग मील) टीएमटी बारस् २००० टीपीडी चे उत्पादन करणे प्रस्तावाबाबत दिनांक ०७/०७/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., प्लॉट नं. जी-७, जी-७ भाग, जी-८, जी-९, जी-१०/१, जी-१०/२, जी-११, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना, ता.जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., प्लॉट नं. जी-७, जी-७ भाग, जी-८, जी-९, जी-१०/१, जी-१०/२, जी-११, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना, ता.जि. जालना येथे प्रस्तावीत केलेल्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि पर्यावरण मंजूरीकरीता (रोलिंग मील) टीएमटी बारस् २००० टीपीडी चे उत्पादन करणे प्रस्तावाबाबत दिनांक ०७/०७/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., प्लॉट नं. जी-७, जी-७ भाग, जी-८, जी-९, जी-१०/१, जी-१०/२, जी-११, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना, ता.जि. जालना येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

सदर जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. केशव नेटके,**<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, जालना. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. सो. म. कुरमूडे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले सदस्य आणि उपस्थित नागरिकांची यादी येथे जोडली आहे. डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., प्लॉट नं. जी-७, जी-७ भाग, जी-८, जी-९, जी-१०/१, जी-१०/२, जी-११, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना, ता.जि. जालना यांच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि रोलिंग मील टीएमटी बारस् २००० टीपीडी चे उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या

अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि., यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. १२/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. ०७/०७/२०२२ वेळ-सकाळी ११.३० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. ०६/०६/२०२२ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या व याबाबत काही सूचना/ आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने चार आक्षेप/प्रकल्पास संमती दर्शविणारे काही सुचना इ. ई-मेल द्वारे तसेच लिखीत स्वरूपात म.प्र.नि. मंडळ, जालना येथे प्राप्त झालेले आहे. यासाठी त्यांनी श्री. एस.एम. कुरमुडे, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे समन्वयक यांना याबाबत माहिती देण्याची विनंती केली. श्री. एम.एम. कुरमूडे, यांनी सांगितले की, द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रामध्ये नियमानूसार ३० दिवस अगोदर सदरच्या जाहीर लोकसुनावणी बाबत नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती तसेच प्रस्तावीत प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतील सारांश यांच्या प्रती संबंधीत ग्रामपंचायत कार्यालय दरेगाव, तसेच वेगवेगळी शासकीय कार्यालये जसे जिल्हाधिकारी कार्यालय जालना, तहसिल कार्यालय जालना, जिल्हा परिषद कार्यालय जालना, जिल्हा उद्योग केंद्र जालना, मंत्रालय, मुंबई, म.प्र.नि. मंडळाचे जालना, औरंगाबाद व मुंबई येथील कार्यालये या ठिकाणी लोकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या आणि सदर प्रकल्पाबाबत जर कुणाला काही सुचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी वर्तमानपत्रामध्ये सदर प्रकल्पाबाबतची जाहीरात प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावे असे लोकांना आवाहन करण्यात आले होते. आणि त्या अनुषंगाने दिं. २४/०६/२०२२ रोजी श्री. सारंगधर बालाजी ढवळे, दरेगाव यांच्या कडून दोन आक्षेप एक इंग्रजी व एक मराठी या दोन्ही आक्षेपांमधील मजकूर सारखाच आहे तसेच व्ही.सुनंदा रेड्डी, तेलंगना व एच. मधूबाबू, हैद्राबाद यांच्या कडून सुचना तसेच प्रकल्पास संमती दर्शविणारे इ. ई-मेल द्वारे प्राप्त झालेले आहे. या पत्रांच्या प्रती सोबत जोडण्यात येत आहेत. या संदर्भात त्यांनी कारखान्याचे प्रतिनीधी यांना याबाबत त्याचं मत मांडावे अशी विनंती केली. यावर श्री. नितीन काबरा, प्रस्तावित प्रकल्पाचे संचालक यांनी सांगितले की, जे काही आक्षेप प्राप्त झालेले आहेत त्याबाबत उत्तरे देण्यात येतील तसेच ते म.प्र.नि. मंडळ ला सादर करण्यात येतील. तसेच एका आक्षेपात नमूद केलेल्या दिनांक १८/०६/२०२२ च्या एका बातमीबाबत श्री. एस.एम. कुरमुडे, यांनी स्पष्ट केले की, या वृत्तपत्रांमध्ये जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली नव्हती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दैनिक सकाळ आणि टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तापत्रामध्ये दिं. ०६/०६/२०२२ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच इग्रजी व मराठीतील सारांश यांच्या प्रती संबंधीत शासकीय कार्यालये येथे ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच त्यांनी नमूद केले की, सद्यस्थितीच्या कारखान्यामध्ये जे उत्पादन सूरू आहेत त्याबाबत रितसर सर्व परवानग्या म.प्र.नि. मंडळाकडून घेण्यात आलेल्या आहे. तसेच सदरची लोकसुनावणीही प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी घेण्यात येत आहे. त्यानंतर त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

प्रकल्प सल्लागार श्री. राजेश मानकर, मे. श्री साई मानसा, नेचर टेक प्रा.लि., हैद्राबाद यांनी प्रस्तावित प्रकल्पा बाबतचे पावर पॉईंट सादरीकरण ज्यामध्ये पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी चा समावेश आहे. आणि सांगितले की, विद्यमान व प्रस्तावित प्रकल्प हा एमएस बिलेटस ७५० टीपीडी ते २००० टीपीडी आणि रोलिंग मील टीएमटी बारस २००० टीपीडी चे उत्पादन करणे बाबत आहे. आणि आजच्या जाहीर लोकसूनावणीचे आयोजन हे मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि. या प्रस्तावित स्थळी करण्यात आलेले आहे. त्यांनी सांगितले की, टीओआर (संदर्भ व अटी) मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि. यांना प्राप्त झालेला आहे. प्रस्तावित विस्तार प्रकल्पासाठी राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) नुसार त्यांनी पर्यावरण सल्लागार, मे. श्री साई मानसा, नेचर टेक प्रा.लि., हैद्राबाद मार्फत आधारभूत निरीक्षण अभ्यास केला आहे आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकनाचा मसुदा सादर केला आहे, त्यानुसार आपण सर्वजण पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी येथे जमलो आहोत. मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स प्रा.लि. कारखान्याची स्थापना सन २००४ मध्ये झाली आहे. प्रकल्पासाठी एकूण ११.८० हेक्टर जमीन उपलब्ध असून त्यापैकी एकूण जमीनीच्या ३३% जमीन हरित पट्टा म्हणून विकसित केली जाईल. आणि नंतर त्यांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केले. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांमध्ये नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. एस.एम. कुरमूडे यांनी उपस्थित नागरीक यांना विनंती केली की, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न, सुचना, टिप्पणी, विचार इ. विचारायचे असतील तर ते त्यांनी त्यांचे नांव व गावाचे नांव सांगून विचारावेत.

जाहीर लोकसूनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पा संबधी काही प्रश्न उपस्थित केले व प्रकल्पाचे संचालकाने त्यांची उत्तरे ही खालीलप्रमाणे आहे.

१. **श्री. अनिल शिंदे**, रा. जालना यांनी मुददा उपस्थित केला की, या प्रकल्पातून सांडपाणी निर्माण होणार आहे का, होत असल्यास त्यावर काय उपाययोजना करण्यात येतील. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, प्रकल्पातून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी निर्माण होत नाही आणि जे काही पाणी आवश्यक आहे ते यंत्रसामग्री थंड करण्यासाठी वापरण्यात येते व गरम झाल्यावर पाण्याचे बाष्पीभवन होते आणि या प्रकल्पातून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी कारखान्याच्या बाहेर जात नाही.

२. **श्री. बाळू विनायकराव सूलताने,** रा. चंदनझिरा यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पाचे प्रर्वतक हे त्यांच्या कंपनीमध्ये झाडे लावणार आहेत की नाही, झाडे लावणार असतील तर किती व कूठे लावणार आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, प्रस्तावित प्रकल्पात नमूद केल्याप्रमाणे ३३% क्षेत्र हे हरित पटटा विकासासाठी राखीव आहे. तसेच सद्य:स्थितीमध्ये कंपनीने ५००० पेक्षा अधिक झाडे लावलेली आहेत व येत्या काही दिवसात त्यात अजून वाढ करण्यात येईल.

३. **श्री. काशीनाथ गोरे,** रा. चंदनझिरा यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पामधून मोठया प्रमाणात आवाज निर्माण होतो ज्यामूळे ध्वनी प्रदूषण होते, आणि ते कमी करण्यासाठी कंपनीने काय उपाययोजना केलेल्या आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, मोठया मशिनी जवळ काम करणा-या कामगारांना ध्वनी प्रदूषण त्रास संभवतो त्यासाठी कामगारांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की, इअर प्लग इ. पुरविल्या जातात तसेच याव्यतिरीक्त इतरही अधिकच्या सुविधा/व्यवस्था केल्या जातात आणि कंपनीच्या बाहेर ध्वनी प्रदूषण होऊ नये म्हणून पूर्ण काळजी घेतली जाते.

४. **श्री. विशाल परमेश्वर कदम,** रा. दावलवाडी यांनी मुददा उपस्थित केला की, कंपनीतील चिमणीमधून निघणाऱ्या धुरासाठी कंपनीने काय उपाययोजना केलेल्या आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, लोखंडी स्क्रॅप वितळून सळया बनवताना जो धूळीचा उत्सर्ग होतो त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या उत्पादनासाठी अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविलेली आहे व तसेच पस्तावित प्रकल्पासाठीही हि बसविली जाईल.

५. **श्री. विकास जालींदर कदम,** रा. भिलपूरी यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्यासाठी किती पाणी लागणार आहे व त्यासाठी काय उपाययोजना केली आहे. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, कारखान्यासाठी सुमारे ६ ते ६.५ लाख लिटर/दिवस पाणी लागणार आहे त्यासाठी, जलस्त्रोत म्हणजे कृत्रीमरित्या तयार केलेल्या धरणात जमा होणारे पावसाचे पाणी वर्षभर वापरले जाते. याशिवाय, कंपनीकडे एमआयडीसीचे पाणी कनेक्शन आहे त्यातून सूदधा पाण्याचा वापर करण्यात येतो.

६. **श्री. पंकज विजय तळकर,** रा. चंदनझिरा यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्याच्या बाहेर झाडे लावता येतील का. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, या प्रकल्पाने जालना जिल्ह्यातील बहुतांश भागात सामाजिक जबाबदारी अंतर्गत वृक्षारोपण केलेले आहे. आणि या वर्षात कंपनीने जालना जिल्हयातील पारसी टेकडी येथे जवळपास २००० झाडे लावण्याचा प्रकल्प सुरू

केला आहे. आणि त्याची तयारी गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असून, आता वृक्षारोपणही सुरू झाले आहे.

७. **श्री. एच. मधूबाबू,** पर्यावरण स्वयंसेवक, हैदराबाद यांनी सांगितले की, त्यांनी आधीच काही सूचनांबाबत पत्र ई मेल द्वारे पाठवले आहे आणि त्यावर कंपनीने समान विचार करावा अशी विनंती केली. त्यावर श्री. एम. एम. कुरमुडे यांनी उत्तर दिले की, आपण पाठवलेल्या पत्राची नोंद घेण्यात आलेली आहे.

८. **श्री. अरूण बालकिशन स्वामी,** रा. जालना येथील रहिवाशी यांनी यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, भट्टीत लोखंड वितळताना निर्माण होणारा घनकचरा वेगळा करून त्याचे वाळूमध्ये रूपांतर केले जाते व ते बांधकामात वापरण्यासाठी उपलब्ध करून दिले जाते. त्यांनी पूढे सांगितले की, हा अतिशय चांगला प्रकल्प असून गेल्या पंधरा वर्षांपासून कूठल्याही नदीतील वाळू न वापरता कंपनीतील बांधकाम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

९. **श्री व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा** यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. औद्योगिक विकासाला पाठिंबा देणारे ते पहिले पर्यावरणवादी असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या मते, बेरोजगारी हे समाजातील प्रमुख प्रदूषण आहे, एक व्यावहारिक पर्यावरणवादी म्हणून, त्यांनी जनसुनावणी पॅनेलला विनंती केली की, एमआयडीसी क्षेत्रातील सार्वजनिक सुनावणी प्रणालीला सूट देण्यासाठी MoEF&CC कडे शिफारस करावी. जनसुनावणी प्रक्रियेस तीन वर्षांचा कालावधी लागतो. आणि तीन वर्षाचा कालावधी लागणार असल्याने रोजगाराच्या संधी तीन वर्ष मागे जाते. कारखाना अंदाजे ३५० नोकऱ्या उपलब्ध करून देत आहे. आणि एमआयडीसी हे विशेषत: औद्योगिक क्षेत्र आहे आणि एकदा ते औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केल्यानंतर, प्रदूषण नियंत्रण उपायांसाठी विशिष्ट निर्बंध आणि अटी आहेत, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे सांगितले की, ते स्वत: ६५ वर्षांचे अनुभवी पर्यावरणवादी आहेत. पर्यावरण सुरक्षेसाठी त्यांनी कारखान्यात पाणी साठविण्याची सूचना केली. पाणी साठवण रचना तयार करणे, गावरस्ते तसेच गावातील वृक्षारोपण करणे, फळझाडे तसेच औषधी व वनस्पतींची लागवण करणे जे खूप उपयुक्त आहेत. श्री. एम. एम. कुरमुडे यांनी सांगितले की, आपण दिलेल्या सूचनांची नोंद घेतलेली आहे. श्री. रेड्डी यांनी पुन्हा एकदा प्रकल्पासाठी शुभेच्छा दिल्या आणि सांगितले की पर्यावरण सल्लागार कंपनीचे अभिनंदन आपण चांगला EIA अहवाल तयार केला आहे.

१०. **श्री. गणेश तूकाराम ढवळे,** माजी सरंपच दरेगाव, रा. दरेगाव येथील रहिवाशी यांनी विचारले की, प्रकल्पाच्या सीएसआर फंडातून दरेगाव ग्रामपंचायतच्या विकास कामासाठी काही करता येईल का. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, निश्चितपणे आणि यापूर्वी दरेगावातील शाळेत ई-लर्निंग चा प्रकल्प कंपनीतर्फे राबविण्यात आला होता. आणि येणाऱ्या काळातही आपल्या सूचनेनुसार नक्कीच मदत करण्यात येईल. श्री. ढवळे, यांनी अजून पूढे विचारले की, गावातील स्मशान भूमी विकासासाठी काहीतरी मदत करावी. श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, प्रकल्प व्यवस्थापनासमोर आपला प्रस्ताव ठेवण्यात येईल आणि व्यवस्थापनेच्या विचारानंतर आपणास याबाबत सकारात्मक उत्तर दिले जाईल. श्री. ढवळे, यांनी पुढे त्यांच्या गावात फक्त १०० झाडे लावावी, परंतु ती झाडे सुरक्षा गार्डसहीत लावली जावीत अशी विनंती केली आणि त्यास प्रकल्प संचालकांनी सहमती दिली.

११. **श्री. रामकिसन ढवळे,** सरंपच दरेगाव, रा. दरेगाव येथील रहिवाशी यांनी विनंती केली की, दरेगाव ग्रामपंचायत गावातील लोकांना अधिकाधिक रोजगार देण्यात यावा. त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, ठीक आहे, आणि सांगितले की, सध्याच्या प्रकल्पात दरेगावमधील जास्तीत जास्त तरुणांना रोजगार मिळत असून प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पात दरेगावच्या लोकांना रोजगारासाठी प्राधान्य दिले जाईल.

१२. **श्री. परमेश्वर संतोष लूहे,** रा. चंदनझिरा यांनी मुददा उपस्थित केला की, स्थानिक लोकांना नोकरी मिळेल का, त्यावर कारखान्याचे संचालक श्री. नितीन काबरा यांनी उत्तर दिले की, सध्याच्या प्रकल्पात ७५% पेक्षा जास्त स्थानिक लोक कार्यरत आहेत आणि प्रस्तावित प्रकल्पात स्थानिक लोकांनाच प्राधान्य दिले जाईल.

डॉ. योगिनी बाळखे यांनी उपस्थित नागरिकांमध्ये महिलांना या प्रकल्पाबाबत त्यांचे काही प्रश्न, मत मांडायचे असतील तर मांडावे अशी विनंती केली, परंतु त्यांच्यापैकी कोणीही पूढे आले नाही. सदर प्रकल्पाबाबत कोणालाच काही प्रश्न, आक्षेप इत्यादी नाहीत असे गृहीत धरून, डॉ. योगिनी बाळखे, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना यांनी जाहीर लोकसूनावणी समितीचे अध्यक्ष व समन्वयक यांच्या परवानगीने उपस्थित नागरिकांचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त केली. या प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या सूचना/आक्षेपांच्या प्रती आणि प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे सोबत जोडण्यात आलेली आहेत.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**केशव नेटके**
(अध्यक्ष)
तथा
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना.

**MINUTES OF ENVIRONMENTAL PUBLIC HEARING IN RESPECT OF PROPOSED EXPANSION OF MS BILLETS 750 TPD TO 2000 TPD & ENVIRONMENTAL CLEARANCE FOR ROLLING MILL FOR MANUFACTURING OF TMT BARS 2000 TPD PROPOSED AT PLOT NO. G-7, G-7 PART, G-8, G-9, G-10/1, G-10/2, G-11, ADDITIONAL MIDC, PHASE-II, JALNA, TQ. & DIST: JALNA, MAHARASHTRA PROPOSED BY M/S. BHAGYALAXMI ROLLING MILLS PVT. LTD., CONDUCTED ON 07/07/2022 AT 11.30 A.M. AT M/S. BHAGYALAXMI ROLLING MILLS PVT. LTD., PLOT NO. G-7, G-7 PART, G-8, G-9, G-10/1, G-10/2, G-11, ADDITIONAL MIDC, PHASE-II, JALNA, TQ. DIST: JALNA, MAHARASHTRA.**

---

An environmental public hearing in respect of proposed **Expansion of MS Billets 750 TPD to 2000 TPD & Environmental Clearance for Rolling Mills for Manufacturing of TMT Bars 2000 TPD** proposed at Plot No. G-7, G-7 Part, G-8, G-9, G-10/1, G-10/2, G-11, Additional MIDC, Phase-II, Jalna, Tq & Dist: Jalna, Maharashtra by **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.**, was conducted on 07/07/2022 at 11.30 a.m. at M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.,Plot No. G-7, G-7 Part, G-8, G-9, G-10/1, G-10/2, G-11, Additional MIDC, Phase-II, Jalna, Tq. Dist: Jalna, Maharashtra.

Following Panel members were present during the public hearing:

1. **Shri. Keshav Netake,**
   Additional District Magistrate, Jalna,
   Dist: Jalna. — Chairman.

2. **Shri. S.M. Kurmude,**
   Sub-Regional Officer,
   M.P.C. Board, Jalna. — Convener.

A list of members and public participants present for Public Hearing is annexed herewith. All those present were given welcome by **Dr. Yogini Balankhe**, Field Officer from Maharashtra Pollution Control Board, and started the proceedings of said public hearing with the permission of the Chairman of said Public Hearing Panel. She stated that "today, we are gathered here for conducting the Environmental Public Hearing by Maharashtra Pollution Control Board regarding the proposed **Expansion Project of MS Billets 750 TPD to 2000 TPD & Environmental Clearance for Rolling Mills for Manufacturing of TMT Bars 2000 TPD** in respect of **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.**, Plot No. G-7, G-7 Part, G-8, G-9, G-10/1, G-10/2, G-11, Additional MIDC, Phase-II, Jalna, Tq. & Dist: Jalna". She stated that as per the Ministry of Environment, Forests & Climate Change, Govt. of India, New Delhi Notification dated 14/09/2006, the said project falls under 'B' Category for which Environmental Clearance is necessary from MoEF&CC and as a part of it, it is mandatory to conduct the Environmental Public Hearing. The application of **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.** for conducting Environmental Public Hearing was received to MPCB on 12/05/2022, accordingly, with the permission of the Hon'ble District Collector, Jalna, the date and time for said public hearing was fixed on 07/07/2022 at 11.30 a.m. The public notice regarding the Environmental Public Hearing

is published in the newspapers Daily Sakal (Marathi) and the Times of India (English) dated 06/06/2022 before 30 days as per the rules. The copies of (Information Booklet) Environment Impact Assessment and Executive Summary of the said project were placed at various concerned Government Offices in the district and offices of Maharashtra Pollution Control Board at Mumbai, Aurangabad and Jalna as well as hoisted on the website of Maharashtra Pollution Control Board for information and study to the citizens and the purpose of which was that the citizens can record their suggestions, notes or objections, if any regarding said project by studying it within 30 days, and they may record the same during the public hearing. Accordingly, some suggestions/objections regarding the said public hearing are received at the Sub-Regional Office, M.P.C. Board, Jalna for which she requested **Shri S.M. Kurmude**, the Convener of Environmental Public Hearing to brief regarding the same. **Shri Kurmude** stated that an public notice regarding the public hearing was published in the newspapers Daily Sakal and The Times of India as well as the documents were placed at local Government offices like, Grampanchayat Office, Daregaon, Zilla Parishad Office, Jalna, Collector Office, Jalna, Tehsil Office, Jalna, Municipal Council, Jalna, District Industries Centre, Jalna, according to which, two objections from Shri. Sarandhar Balaji Dhawale, Daregaon village, Tal. Dist Jalna one in English and one in Marathi dated 24/06/2022 are received, both are having one and same contains and according to the information hoisted on website of Maharashtra Pollution Control Board, two supportive/supporting suggestions. i/e/ one from Shri Sunanda Reddy, Telangana and one from Shri H. Madhubabu, Hyderabad are received. In this respect, he requested the Factory Representative to express their opinion, upon which, **Shri Nitin Kabra**, the Director of the proposed project stated that they will answer about the said objections/suggestions and will submit the same to M.P.C. Board. Regarding a news dated 18/06/2022 mentioned in one of the objections, Shri Kurmude clarified that it is not correct as the Maharashtra Pollution Control Board has published a public notice regarding public hearing in the newspapers Daily Sakal and the Times of India dated 06/06/2022, 30 days before the date of public hearing as per rules and accordingly the documents regarding the public hearing were placed at various Government offices. Then, **Shri Kurmude** requested the Project Proponent to brief the information of their existing as well as proposed Expansion Project.

Then, **Shri Rajesh Mankar**, the Project Consultant from M/s. Sri Sai Manasa Nature Tech Pvt. Ltd., Hyderabad started the power point presentation of the existing and proposed project including the details of project, environmental pollution, plans, devices, control measures to be taken thereof and stated that the proposed project is for Expansion of MS Billets from 750 TPD to 2000 TPD and Environmental Clearance for Rolling Mill for Manufacturing of TMT Bars – 2000 TPD and today's public hearing has been organized at the project site of **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.** and he showed a slide showing the address of said project. He stated that a TOR (Terms of Reference) has been received to **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.** from State Environment Impact Assessment Authority (SEIAA) for the proposed Expansion Project, according to which they have carried out the baseline monitoring study through Environment Consultant, M/s. Sri Sai Manasa Nature Tech Pvt. Ltd. and have submitted the Draft Environment Impact Assessment and according to which all of us are gathered here for the public hearing. The factory of **M/s. Bhagyalaxmi Rolling Mills Pvt. Ltd.** has been established in the year 2004. He showed names of the Directors of the Company. The total land available for the project is **11.80** hectares out of which 33% of land of the total land will be developed as Green Belt. Then he concluded the power point presentation of said project.

Then, **Shri S.M. Kurmude**, Sub-Regional Officer, MPCB, Jalna & Convener of Public Hearing Panel requested the public participants that if anybody would like to ask any question, doubt, etc. regarding said project, same may be asked by telling their own name & village.

During the course of public hearing, certain questions related with said project raised by the public participants and panel members and answered the same by the Project Proponent are as below:

1. **Shri. Anil Shinde**, a resident of Jalna town asked whether effluent will be generated from the said project, if so, what measures will be taken thereof, upon which, **Shri Nitin Kabra**, the Director of the Project replied that no any type of effluent generates from the project and whatever the water required daily is top-up and whatever water evaporates after getting hot during cooling of machineries, only water equal to the water loss though evaporation is feed back in the project; and no any type of effluent generates from the said project.

2. **Shri Balu Vinayakrao Sultane**, a resident of village Chandanzira, Tq. & Dist: Jalna asked the Project Proponent whether trees will be planted in their company and how many and where the trees will be planted. Shri Kabra replied that as reported in the introduction, 33% area is reserved for planting the trees. At present also, the company is having more than **5000** trees planted and it will be increased again in the coming days.

3. **Shri Kashinath Gore**, a resident of village Chandanzira, Tq. & Dist: Jalna stated that big sound is generate from the project due to which causes noise pollution and asked about the measures to be taken to reduce the same, upon which **Shri Kabra** stated that noise pollution is troublesome to the workers working near the machineries for which personal protective equipments like ear plug, etc. are provided to the workers and more other arrangements are done and complete care is taken so as not to cause the noise pollution outside the company.

4. **Shri Vishal Parmeshwar Kadam**, a resident of village Dawalwadi, Tq. & Dist: Jalna asked about the planning to be done for smoke emitted from the stack. **Shri Kabra** stated that the air emitted while separating iron is sent by purifying it and this system is already in existing project and same will be followed in the proposed project. **Shri S.M. Kurmude**, Sub-Regional Officer, MPCB, Jalna & Convener of Public Hearing Panel after asking about upgradation in air pollution control system, **Shri Kabra** stated that they are the first to provide secondary fumes collection system at their existing unit under the guidance of the Hon'ble District Collector & MPCB. In the earlier period, at the time of charging, lot of smoke was being emitted from the upper side of the shed, such smoke now, will be captured through secondary fumes extraction system and dust will be separated from smoke and metal will also be extracted from the dust and such secondary emission control system has been provided at their existing unit and same is in operation smoothly since last one year and this technology is used for separating the dust particles from the dust.

5. **Shri Vikas Jalindar Kadam**, a resident of village Bhilpuri, Tq. & Dist: Jalna asked about the requirement of water for the factory and how it will be fulfilled. **Shri Kabra** stated that about **6 – 6.5** Lakh Ltrs./day of water requires for the factory and the source of which is rain water collected in a artificial created dam and it is used throughout the year. Besides, this, one MIDC water connection is also there from which also they use water.

6. **Shri Pankaj Vijay Talkar,** a resident of village Chandanzira, Tq. & Dist: Jalna asked whether trees can be planted outside the factory, upon which **Shri Kabra** stated that most of the time, the said project has planted trees in most of the areas of Jalna district under the Social Responsibility and in this year, they have started a project of planting **20000** trees at Parsi Tekadi and the preparation of the same has been started from last three months and now, planting is also started.

7. **Shri H. Madhubabu**, the Environment Volunteer, Hyderabad stated that he has already sent a letter regarding some suggestions and requested to consider the same, upon which **Shri Kurmude** stated that a note of the same is taken.

8. **Shri Arun Balkishan Swami**, a resident of Jalna town asked about the measures taken for the solid waste generated from the project. **Shri Kabra** stated that the solid waste, i.e. slag generated during melting of iron in furnace is separated and converted into sand through treatment and make available the same for use in construction. He also stated that it is very unique project and since last fifteen years the construction work has been done without taking any type of river sand on the factory permission.

9. **Shri V. Sunanda Reddy**, an Environmentalist, Telangana gave his best wishes and support to the management. He stated that he is the first Environmentalist to support the industrial development. In his opinion, unemployment is the major pollution to the society, as a practical Environmentalist, he is requesting the Public Hearing Panel to recommend MoEF&CC to please exempt the public hearing system in MIDC Areas, as he feels that public hearing process takes three year time, the factory is providing approximately **350** jobs and as it will take three years time, employment opportunities will go three years back and also MIDC specifically is the Industrial Area and once it is declared as Industrial Area, there are specific restrictions and conditions for pollution control measures, which is the same and repeated situation, stated by him. He further stated that he is experienced Environmentalist of 65 years old not facing a single health problem till today, he is experiencedly demanding the Ministry of Environment to please exempt the public hearing process, which is his suggestion. As an environment safety, he suggested to take water harvesting as factory is having approx. **29** acres of land and approx. **10** Cr. Litres of rain water receives every year in the area, so he suggested to construct water harvest structure, to plant avenue and village plantation, to take fruit bearing plants and medical plant, which are very useful. **Shri Kurmude** stated that his suggestions are noted. **Shri Reddy** once again

gave his best wishes for the project and stated that he congratulates the Environmental Consultancy who has prepared a good EIA report.

10. **Shri Ganesh Tukkaram Dhawale**, the Ex. Sarpanch, Daregaon, Tq. & Dist: Jalna asked whether something can be done for their village through CSR funds, upon which **Shri Kabra** stated that definitely, and previously e-learning project was conducted in the school of their village and will definitely help in coming period also as per the suggestions. **Shri Dhawale** requested to do something about Cemetery (*Smashan Bhoomi*) of their village, upon which **Shri Kabra** stated that said proposal will be placed before their management and accordingly positive reply will be given. **Shri Dhawale** further requested to plant only **100** trees at their village, but it shall be planted with tree guard and it is agreed by the Director of Project.

11. **Shri Ramkisan Dhawale**, the Sarpnch, Daregaon, Tq. Dist: Jalna requested to give more and more employment to the people in their village, upon which **Shri Kabra** said Okay and stated that at present also maximum youths from Daregaon are employed in the existing project and preference will be given for employment to the people of Daregaon in the proposed expansion project.

**Dr. Yogini Balanhe** requested the women present during the public hearing for expressing their views regarding said project, but none of them said anything.

12. **Shri Parmeshwar Santosh Luhe**, resident of village Chandanzira, Tq. & Dist: Jalna asked whether job will get to local people, upon which **Shri Kabra** stated that at present also more than **75%** of local people are employed in the existing project and preference will be given for the local people in the proposed project.

Assuming that nobody is having any question, notes, objections, etc. regarding said project, **Dr. Yogini Balankhe**, Field Officer from MPCB, Jalna with the permission of the Chairman of Public Hearing Panel concluded the Public Hearing with a vote of thanks to all the public participants. The copies of suggestions/objections received regarding the said project and the replies given to them by the Project Proponent are enclosed herewith.

Lastly, the Public Hearing ended with a vote of thanks to the **Chair**.

**(S.M. Kurmude)**
Convener
And
Sub-Regional Officer, MPCB, Jalna

**(Keshav Netake)**
Chairman
And
Additional District Magistrate, Jalna